# प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.

"वनभवन", रामगिरी मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर.

**गोपनीय**
डाक नोंद पोम्पटेंय

विषय: श्री. ए.एन. खडसे, भावसे, तत्का.उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत.

क्रमांक: कक्ष-९/भावसे/विचौ/प्रक्र २८/१५३/२०१०-११
नागपूर, दिनांक १८ मे, २०१०.

प्रति

अपर मुख्य सचिव (वने),
महसूल व वन विभाग,
मुंबई.

संदर्भ :१. महसूल व वन विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. एएफओ-१३०६/ ११५८/प्र.क्र.१६७/फ-७, दिनांक १७.४.२०१०.

२. हया कार्यालयाचे गोपनीय पत्र क्र कक्ष-९/भावसे/विचौ/ प्र.क्र. २८/१३८/२०१०-११, दिनांक २९/४/२०१०.

...

कृपया उपरोक्त संदर्भाकीत पत्र पहावे. संदर्भाकीत पत्र अ.क्र.१ अन्वये मे. श्री.प्रिकोटेड स्टील लि., सणसवाडी, ता. शिरुर व श्रीमती समजूबेन शामलाजी अजमेरा ट्रस्ट यांचेशी श्री. ए.एन. खडसे, भावसे, तत्का. उपवनसंरक्षक, जुन्नर यांनी वन विभागातील १०२.८० हे. क्षेत्रावर वनीकरण व इतर कामे करण्यासंबंधी दिनांक २४/४/२००३ रोजी केलेल्या कराराच्या अनुषंगाने तत्कालीन मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे श्री. प्र.ज. ठोसरे व तत्कालीन मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे श्री.शिरीष अस्थाना यांच्या भूमीके बाबत चौकशी करुन स्वयंस्पष्ट अहवाल शासनास सादर करण्यास कळविले होते. सदर पत्रात श्री. प्र.ज. ठोसरे यांचे दिनांक १३.१०.२००५ चे अर्धशासकीय पत्र तसेच श्री. शिरीष अस्थाना यांचे दिनांक २३.१.२००७ चे पत्रांचा प्रामुख्याने उल्लेख करण्यांत आलेला आहे. या संदर्भात उपलब्ध दस्ताऐवजांची तपासणी केल्यावर खालील बाबी स्पष्ट होतात.

.य. नस्तीवर काळ सादर राव.
२६.५.२०१०
.स.(फ-७)

अ) **श्री. प्र.ज. ठोसरे यांची भूमिका** :-

१. मे. श्री.प्रिकोटेड स्टील लि., सणसवाडी, ता. शिरुर व श्रीमती समजूबेन शामलाजी अजमेरा ट्रस्ट यांचेशी केलेला करार हा वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या

तरतूदी प्रमाणे नव्हता, ही बाब स्वयंस्पष्ट आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर तत्कालीन मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे श्री. प्र.ज. ठोसरे यांनी त्यांचे दिनांक २/११/२००२ च्या पत्राप्रमाणे उप वनसंरक्षक, जुन्नर यांना "केंद्र सरकारच्या पर्यावरण व वने मंत्रालय यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन घेवून प्रकरण या कार्यालयास आपल्या संस्करणासह पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे "असे निर्देश दिले होते (सहपत्र - १). तथापी त्यानंतर दिनांक १०/१२/०२ च्या पत्रान्वये श्री. प्र.ज. ठोसरे, तत्कालीन मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे यांनी खालीलप्रमाणे सूचना तत्कालीन उप वनसंरक्षक, जुन्नर यांना दिल्या. (सहपत्र -१ अ).

"मे. श्री.प्रिकोटेड स्टील लि., सणसवाडी, ता. शिरुर, जि. पुणे ह्या खाजगी संस्था केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व अटींची पूर्तता करीत असल्यास त्यांचेशी आपले अधिकार कक्षेत विभागीय स्तरावर त्रिपक्षीय करारनामा करुन कराराप्रमाणे प्रस्तावातील कामांची अंमलबजावणी आपल्या जबाबदारीवर व नियंत्रणाखाली करुन घेण्यासाठी अनुमती प्रदान करण्यांत येत आहे. तसेच सदर प्रकल्प कालावधीत करारनामा प्रमाणे केंद्र शासनांचे मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी."

२. श्री. अे.एन. खडसे, तत्कालीन उपवनसंरक्षक, जुन्नर यांनी मे. श्री.प्रिकोटेड स्टील लि., सणसवाडी, ता. शिरुर व श्रीमती समजूबेन शामलाजी अजमेरा टस्ट यांचेशी दिनांक २४/४/२००३ रोजी केलेला करार हा केंद्र शासनाच्या दिनांक ७ जून, १९९९ च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे नव्हता. (सहपत्र क्र.२). श्री. अे.एन. खडसे यांचे विरुध्द प्रस्तावित शिस्तभंग विषयक कारवाई ही प्रामुख्याने त्यांनी केलेल्या कराराच्या अटी केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने नसल्याने व वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतूदींचे उल्लंघन करणारे असल्याने करण्यांत आलेली होती. ही बाब दोषारोपपत्राच्या जोडपत्र २ मधील बाब क्र. (i) ते (xi) वरुन स्पष्ट होते (सहपत्र -३). श्री. खडसे यांनी स्वत:हून त्यांचे स्तरावर करारनाम्यातील अटी निश्चीत केल्याचे दिसून येते. ही बाब त्यांनी संबंधित वनपरिक्षेत्राधिकारी, शिरुर यांना त्यांचे अ.शा.पत्र दिनांक ४/२/२००३ अन्वये दिलेल्या पत्रावरुन स्पष्ट होते (सहपत्र-४). सदर पत्रातील परिच्छेद क्र. ९ व १० खालीलप्रमाणे आहेत.

परिच्छेद ९. "वन विभागाकडे वनक्षेत्र विकासासाठी निधीचा तुटवडा आहे. तव्दतच उपलब्ध मनुष्यबळ अत्यंत कमी असल्यामुळे वनक्षेत्र विकासाकरीता ब-याच मर्यादा आहेत. कंपनीने विकासासाठी पुढाकार घेतलेले क्षेत्र औद्योगिक परिसरात सामावलेले असल्यामुळे वनविकास करुन क्षेत्र प्रदुषणरहीत करण्यांस वन विभागाची अत्यंत महत्वाची भूमिका लक्षात घेवून उपवनसंरक्षक, जुन्नर यांनी कंपनीसोबत विशेष बाब म्हणून क्षेत्र विकासाकरीता १० वर्ष कालावधीचा सामंजस्य करार करण्याचा

धोरणात्मक निर्णय घेतला असून तो सामंजस्य करार केलेल्या दिनांकोपासून अंमलात येईल."

परिच्छेद १०."केंद्र शासनाच्या धोरणानुसार क्षेत्र विकासासाठी ५ ते ७ वर्ष कालावधी निर्धारीत केला आहे. परंतु कंपनीला हस्तांतरीत करावयाची वन विभागाकडे असलेली वन जमीन अत्यंत निकृष्ट दर्जाची, खडकाळ, मुरुमी व संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील असल्याने सदर कराराचा कालावधी १० वर्ष करण्याबाबतचा प्रस्ताव उपवनसंरक्षक, जुन्नर यांच्या विचाराधीन आहे. तशा प्रकारचा विशेष बाब प्रस्ताव केंद्र शासन, वन व पर्यावरण मंत्रालयाकडे यथाशिघ्र सादर करण्यांत येईल. प्रस्तावित केल्याप्रमाणे १० वर्ष कालावधीसाठी केंद्र शासनाकडून मंजूरी मिळाल्यास तेवढया कालावधीसाठी वनक्षेत्र विकासासाठी कंपनीस अनुमती राहील. जर केंद्र शासनाने १० वर्ष सामंजस्य करारास अनुमती नाकारली तर सदरचा कालावधी ७ वर्ष एवढया कालावधीसाठी अंमलात राहील."

३. वरील कंपनी/अशासकीय संस्थांशी केलेल्या कराराची माहिती हया कार्यालयाचे निदर्शनास आल्यानंतर मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे यांना वेळोवेळी यासंबंधात आवश्यकते प्रमाणे उपयुक्त निर्देश देण्यांत आले. तसेच तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांनी श्री. प्र.ज. ठोसरे, तत्कालीन मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे यांना सदर क्षेत्राची समक्ष पाहणी करुन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतुदींचे उल्लंघन संबंधात विस्तृत अहवाल सादर करण्याबाबत त्यांचे अ.शा.पत्र क्र.D-१७/NC/RS/९७९ of ०५-०६, दिनांक ६/९/२००५ अन्वये निर्देश दिले. (सहपत्र क्र.५ ). सदर निर्देशांची पूर्तता करुन श्री. प्र.ज. ठोसरे, तत्कालीन मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे यांनी संदर्भ १ मधील शासन पत्रात उल्लेखित त्यांचा दिनांक १३/१०/२००५ चा अहवाल सादर केला असून त्यातील परिच्छेद ९ प्रमाणे "वरील सर्व वस्तुस्थितीचा विचार करता तत्कालीन उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेकडून वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतूदींचा भंग झाला नसल्याचे स्पष्ट होत आहे" असे भाष्य केले आहे.

४. श्री. प्र.ज. ठोसरे, तत्कालीन मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे यांनी सुरवातीलाच त्यांचे दिनांक १०/१२/२००२ चे पत्रात "केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनांनुसार मे. श्री.प्रिकोटेड स्टील लि., सणसवाडी, ता. शिरुर व श्रीमती समजूबेन शामलाजी अजमेरा टस्ट ही खाजगी संस्था असल्याने त्यांचेशी आपले अधिकार कक्षेत, विभागीय स्तरावर त्रिपक्षीय करारनामा करुन कराराप्रमाणे प्रस्तावातील कामांची जबाबदारी आपल्या जबाबदारीवर व नियंत्रणाखाली करुन घेण्यासाठी अनुमती प्रदान करण्यांत येत आहे", असे निर्देश तत्कालीन उपवनसंरक्षक, जुन्नर यांना दिले होते. तसेच "सदर प्रकल्प कालावधीत करारनाम्या प्रमाणे केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी," असेही त्यात स्पष्ट करण्यांत आले होते. यावरुन असे दिसून येते की, श्री. अे.एन. खडसे यांनी त्यांचे वरिष्ट अधिकारी श्री. प्र.ज. ठोसरे, तत्कालीन मुख्य

वन संरक्षक (प्रा.) पुणे यांचे निर्देशांची योग्यप्रकारे अंमलबजावणी न करता स्वत:हून वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतूदींचा भंग केलेला आहे.

यासंबंधात तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांचेकडील खालील पत्रांच्या प्रती सहपत्रित करण्यांत येत आहेत (सहपत्र-६ (i) ते ६ (iv)).

I) श्री. बी.के. सिंग, तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांचे पत्र दिनांक ७/५/२००५.

II) श्री. के.सुब्रम्हणीयम, तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांचे पत्र दिनांक ३०/५/२००५.

III) श्री. जे.एन. सक्सेना, तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांचे पत्र दिनांक २२/११/२००५.

IV) श्री. ज्वालाप्रसाद, तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांचे पत्र दिनांक १६/५/२००८.

५. सदर प्रकरणाचे संदर्भात यापूर्वीही शासन स्तरावर विचार होवून संबंधितांवर जबाबदारी निश्चीत करण्याचे सूचित करण्यांत आले होते. श्री. अे.एन. खडसे, तत्कालीन उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेवर त्यांनी केलेल्या काही विशीष्ट कारणांमुळे जबाबदारी निश्चीत करण्यांत आली होती. त्यांनी केलेल्या कृतीचा तपशील शासन पत्र दिनांक १८/९/२००६ प्रमाणे नमूद आहे (सहपत्र क्र.७)

६. वरील सर्व बाबींचा विचार केल्यास असे दिसून येते की, श्री. प्र.ज. ठोसरे, तत्कालीन मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे यांनी सदर प्रकरणी घेतलेली भूमिका व श्री. अे.एन. खडसे, तत्कालीन उपवनसंरक्षक, जुन्नर यांनी प्रत्यक्षात केलेली कार्यवाही या दोन्ही बाबी वेगवेगळया स्वरुपांच्या आहेत. श्री. खडसे यांची कृती विस्तृतपणे त्यांचे प्रकरणी प्रस्तावित केलेल्या दोषारोपपत्रात नमूद करण्यांत आलेली आहे. श्री. खडसे यांची भूमिका स्पष्टपणे वन (संवर्धन) अधिनियमाचे उल्लंघन करणारी असून त्याला श्री ठोसरे यांनी व्यक्त केलेले मत कारणीभूत आहे असे निष्कर्ष काढता येणार नाही, ही बाब घटनाक्रमाचा विचार केल्यावर दिसून येते. कदाचित त्याच कारणामुळे या पूर्वी सदर प्रकरणी संबंधितांची जबाबदारी निश्चीत करतांना तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे तर्फे श्री. ठोसरे यांचे विरुध्द कोणतीही कारवाई वरील परिच्छेद ४ मधील दिलेल्या या कार्यालयाचे दिनांक ७/५/२००५, ३०/५/२००५, २२/११/२००५ व दिनांक १६/५/२००८ च्या अहवालात प्रस्तावित करण्यांत आली नसावी. तथापि श्री. ठोसरे यांची भूमीकेची नव्याने आता शासन स्तरावर विचार होत असल्याने खालील बाबी शासनाचे निदर्शनास आणून देण्यांत येत आहे.

अ) तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांनी दिनांक ३१/१/२००२ चे अर्धशासकीय पत्रान्वये तत्कालीन मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे यांना अशासकीय संस्थांच्या सहभागाने वन जमीनीवर वनीकरण व अनुषंगिक कामे हाती घेण्याकरीता करारनामा करण्याचे अधिकार दिलेले नव्हते. वस्तुस्थितीत सदरहू अर्धशासकीय पत्राव्दारे केंद्र शासनाने अशासकीय संस्थेंच्या सहभागाबाबत काढलेली मार्गदर्शक सूचना संलग्न करुन पाठविण्यांत आली असून त्या संदर्भात १० दिवसांच्या आंत मुल्यनिर्धारण अहवालासह प्रस्ताव सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते (पत्र दिनांक ३१.१.२००२ ची प्रत संलग्न - सहपत्र-९). सदर प्रकरणी श्री. प्र.ज. ठोसरे, तत्कालीन मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे यांनी त्यांचे दिनांक २/११/२००२ च्या पत्रान्वये प्रस्ताव त्यांना सादर करण्यासंबंधी सूचना तत्कालीन उपवनसंरक्षक, जुन्नर यांना दिल्या होत्या. यावरुन असे दिसून येते की, तत्कालीन मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे यांना त्यांचे अधिनस्थ उपवनसंरक्षक यांना वन जमिनीबाबत करार करण्याचे अधिकार नव्हते याची जाणीव होती. तथापी, श्री. ठोसरे यांनी त्यांचे दिनांक १०/१२/२००२ च्या पत्राप्रमाणे तत्कालीन उपवनसंरक्षक, जुन्नर यांना "मे. श्री.प्रिकोटेड स्टील लि.,यांचेशी करार करण्याची अनुमती दिली होती, ही बाब त्यांचे स्वत:चे दिनांक २/११/२००२ च्या आदेशांशी विसंगत आहे.

ब) श्री.प्र.ज. ठोसरे यांनी संदर्भाधीन क्षेत्राची पहाणी करुन त्यांचे दिनांक १३/१०/२००५ चे पत्रान्वये तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांना अहवाल सादर केला असून सदर अहवालातील परिच्छेद क्र. ४.५, ७.३ व ७.४ नुसार काही महत्वांच्या बाबींचे संदर्भात तत्कालीन उपवनसंरक्षक, जुन्नर यांचे अहवाल प्रलंबित असूनही त्यांचे अहवालातील परिच्छेद ९ प्रमाणे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग झाला नसल्याचे निष्कर्ष काढले. प्रकरणाशी संबंधित परिपूर्ण माहिती अप्राप्त असूनही त्यांनी अशाप्रकारचे निष्कर्ष काढणे संयुक्तीक नव्हते.

क) श्री. प्र.ज. ठोसरे यांनी दिनांक १३/१०/२००५ चे अहवालातील परिच्छेद ५.१ व ५.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे "मे. श्री.प्रिकोटेड स्टील लि. यांनी संदर्भाधीन क्षेत्रात बांधकाम व रस्ते व इतर कामे केले होते. तसेच सदर पत्रातील परिच्छेद ७.४ प्रमाणे सदर कामांना वेळीच प्रतिबंध कां केला नाही असे तत्कालीन उपवनसंरक्षक, जुन्नर यांना विचारणा करण्यांत आली. तरीही अहवालात तत्कालीन उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेकडून वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग न झाल्याचे निष्कर्ष काढणे हे परिस्थितीशी विसंगत दिसते.

येथे असे नमूद करावेसे वाटते की, सदर प्रकरणी या पूर्वी शासन स्तरावर विस्तृतपणे विचार झाल्याचे दिसून येते. तसेच संदर्भाधीन क्षेत्राची तपासणी तत्कालीन सह सचिव (वने) यांनीही केली आहे. त्याचप्रमाणे सदर करारनाम्याच्या अनुषंगाने अपीलीय प्राधिकारी म्हणून शासनाने निर्णय घेणे अपेक्षित होते. (कृपया सहपत्र ८

पहावे). या संदर्भात शासन स्तरावर घेण्यांत आलेला निर्णय या कार्यालयाचे अभिलेख्यावरुन दिसून येत नाही. तथापी सदर क्षेत्र मे. श्री.प्रिकोटेड स्टील लि., यांना वर्ग करणे संबंधी प्रस्ताव राज्य शासनाच्या पत्र क्र. FLD-1908/CR-358/F-10, दिनांक १७/३/२००८ अन्वये वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यांत आले व त्यानंतर ग्रामपंचायत कोरेगांव भिमा यांनी विरोधात पारित केलेले ठराव लक्षात घेता सदर प्रस्ताव शासन पत्र क्र. FLD-1908/CR-358/F-10, दिनांक २८/५/२००८ अन्वये मागे घेण्यांत आला. ही वस्तुस्थिती लक्षात घेता श्री. प्र.ज. ठोसरे यांचेकडून वरील बाबींचे संदर्भात स्पष्टीकरण प्राप्त करुन सदर प्रकरणी शासन स्तरावर यथायोग्य निर्णय घेणे उचित राहील.

ब) **श्री. शिरीष अस्थाना यांची भूमिका :-** श्री. शिरीष अस्थाना यांची पदस्थापना तत्कालीन मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे या पदावर श्री. प्र.ज. ठोसरे यांची बदली झाल्यानंतर करण्यांत आली. श्री. शिरीष अस्थाना यांचा मुख्य वन संरक्षक (प्रा.) पुणे या पदाचा कार्यकाळ मे. श्री.प्रिकोटेड स्टील लि., सणसवाडी, ता. शिरुर व श्रीमती समजूबेन शामलाजी अजमेरा टस्ट यांचेशी झालेल्या कराराच्या ब-याच कालावधीनंतर सुरु झाला व त्यांचा कार्यकाळ सुरु होण्यापूर्वी सदर प्रकरणी हया कार्यालयाचे स्तरावर संबंधितांचे विरुध्द जबाबदारी निश्चीत करण्यांत आली होती. श्री. अस्थाना यांनी त्यांचे पत्र दिनांक २३/१/२००७ मध्ये श्री. खडसे यांनी सादर केलेल्या त्यांच्या दिनांक १२/१२/२००६ रोजीचे पत्राचे अनुषंगाने सहमती दर्शविलेली आहे. तथापी असे करतांना त्यांनी त्यांचे स्तरावर कोणतेही विश्लेषण केल्याचे दिसून येत नाही. त्यापूर्वीही त्यांचे अगोदर कार्यरत तत्कालीन मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे यांचे स्तरावर सदर प्रकरणी अहवाल सादर करण्यांत आलेला होता. श्री. अस्थाना यांनी कार्यभार घेतल्यानंतर केवळ औपचारिकता म्हणून तत्पूर्वी व्यक्त केलेल्या मतास पृष्टांकीत केल्याचे दिसून येते. श्री. अस्थाना यांचे सदर पत्र प्राप्त होण्यापूर्वीच सदर प्रकरणी श्री. खडसे यांचेविरुध्द हया कार्यालयाचे पत्र दिनांक २०/४/२००६ नुसार प्रारुप दोषारोपपत्र शासनास सादर केलेले होते. म्हणून श्री. अस्थाना यांचे सदर पत्रात नमूद केलेल्या भूमीकेचे विशेष महत्व राहत नाही. तसेच सदर प्रकरणी त्यांचे विरुध्द विभागीय कारवाई करण्याईतपत ही बाब गंभीर दिसून येत नाही.

सहपत्रे :-वरीलप्रमाणे.

९/५/१०

प्रधान मुख्य वनसंरक्षक (हेड ऑफ फॉरेस्ट फोर्स),
महाराष्ट्र राज्य, नागपूर.